# समुदाय आधारित संस्था स्तरावर संपादन प्रक्रियेबाबत विचारण्यात येणारे प्रश्न

| अ. क्र. | विचारण्यात येणारे प्रश्न व त्याबाबतची माहिती |
|---|---|
| १ | **सी.बी.ओ.स्तरावरील संपादन प्रक्रिया कोणत्या मार्गदर्शन सुचनेनुसार करणे बंधनकारक आहे का ?** |
| | सी.बी.ओ.स्तरावरील संपादन प्रक्रिया हि जागतिक बँकेच्या रेग्युलेशन प्रमाणे प्रकल्पाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या संपादन मार्गदर्शक सुचनेनुसार करणे बंधनकारक आहे. |
| २ | **सी .बी.ओ.स्तरावरील संपादन प्रक्रिया कोणत्या घटकांसाठी करायची आहे?** |
| | समुदाय आधारीत संस्थांनी तयार केलेल्या उपप्रकल्पांना राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समितीकडुन मंजूर करण्यात आलेल्या घटकांसाठी करावयाची आहे. |
| ३ | **सी.बी.ओ.स्तरावरील संपादन प्रक्रिया कधी चालू करायची आहे?** |
| | समुदाय आधारीत संस्थांनी तयार केलेल्या उपप्रकल्पांना राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समितीकडुन मंजुरी प्राप्त झाल्या नंतर चालू करायची आहे परंतु निवड करणात आलेल्या पुरवठादार /ठेकेदारास बँक कर्ज मंजूर झाल्यानंतर (कर्ज घेणार असल्यास ) पुरवठा /कार्यादेश देण्यात यावा. |
| ४ | **सी .बी.ओ.स्तरावरील संपादन प्रक्रिया कोणी करायची आहे?** |
| | सी .बी.ओ.स्तरावरील संपादन प्रक्रिया ही त्यांच्या स्तरावर गठीत केलेल्या संपादन समितीनेच करायची आहे. |
| ५ | **सी .बी.ओ.स्तरावरील संपादन समिती मध्ये तांत्रिक सहकार्य कोण करेल?** |
| | जिल्ह्या अंमलबजावणी कक्षातील पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ तथा जिल्हा कृषि व्यवसाय सल्लागार हे तांत्रिक सहकार्य करेल तसेच तो/ती समितीचा पदसिद्ध सदस्य आहे. |
| ६ | **सी.बी.ओ.स्तरावरील संपादन समितीस कोण मान्यता देईल ?** |
| | संपादन समिति ही संचालक मंडळाचे प्रतिनिधित्व करत असल्याने संपादन समितीस संचालक मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. |
| ७ | **सी .बी.ओ.स्तरावरील संपादन प्रक्रियेच्या कोण कोणते टप्पे आहेत?** |
| | १. संपादन समिती स्थापन करून त्यास संचालक मंडळाची मान्यता घेणे.<br>२. संपादन आराखडा तयार करणे त्यास संचालक मंडळाची व जिल्हा अमलबजावणी कक्षाची मान्यता घेणे.<br>३. ज्या घटकाची संपादन करायचे आहे त्याच्या अंदाजित खर्चानुसार प्रकल्पाने प्रसिद्ध केलेल्या नमुना E2/ E5 / W2 /W5 मध्ये दरपत्रक/निविदा दस्तऐवज तयार करणे.<br>४. वरील दस्तऐवज प्रारूप जिल्हा अंमलबजावणी कक्षास पूर्व मान्यतेसाठी सादर करणे.(रु. १० लक्ष वरील खरेदीस)<br>५. दस्तऐवज प्रारूपास जिल्हा अंमलबजावणी कक्षाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये योग्य ती माहिती भरून निविदा सूचनेची जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे तसेच निविदा दस्तऐवज प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यास जिल्हा/विभागीय अंमलबजावणी कक्षास सादर करणे.<br>६. आवश्यकतेनुसार निविदा दस्तऐवज मध्ये नमूद केलेल्या निश्चित वेळेत संभाव्य निविदाधारकांच्या समवेत निविदा पूर्व बैठकीचे आयोजन करणे.<br>७. निविदा पूर्व बैठकीचे इतिवृत्त तयार करून त्यावर सर्व संपादन समितीच्या स्वाक्षरी घेऊन प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यास जिल्हा/विभागीय अंमलबजावणी कक्षास सादर करणे.<br>८. दरपत्रक विनंती पत्र / निविदा दस्तऐवजात नमूद केल्यानुसार निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीत कमीत कमी ३ दरपत्रक/ निविदा प्राप्त न झाल्यास त्यास ७ दिवसांची २ वेळा मुदतवाढ देण्याबाबत शुद्धीपत्रक प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यास जिल्हा अंमलबजावणी कक्षास पाठविणे. |

| अ. क्र. | विचारण्यात येणारे प्रश्न व त्याबाबतची माहिती |
|---|---|
| | ९. दरपत्रक विनंती पत्र / निविदा दस्तऐवजात / शुद्धीपत्रकात निश्चित केलेल्या वेळेत तांत्रिक लिफाफा उघडणे. (रु.३ लाखावरील संपादनाबाबत )<br>१०. तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर प्राप्त तांत्रिक दस्तऐवजानुसार निविदा दस्तऐवज मध्ये नमूद केल्यानुसार किमान पात्रता अटीनुसार तांत्रिक दस्तऐवजाची तपासणी करून त्याचा तांत्रिक दस्तऐवज तपासणी अहवाल संपादन समितीने तयार करून त्यावर स्वाक्षरी करून तो जिल्हा अंमलबजावणी कक्षास मान्यतेसाठी सादर करणे.<br>११. तांत्रिक तपासणी अहवालास जिल्हा अंमलबजावणी कक्षाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यातील तांत्रिक दृष्ट्या पात्र निविदाधारकांना त्यांचे आर्थिक प्रस्ताव उघडण्याची तारीख,वेळ व ठिकाण कमीत कमी २ दिवस अगोदर कळवून त्यांना उपस्थित राहण्यास लेखी कळविणे तसेच जे निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या अपात्र आहेत त्यांना त्याच्या अपात्रतेची कारणे लेखी कळविणे.<br>१२. सर्व पात्र निविदाधारकांचे आर्थिक प्रस्ताव संपादान समिती व उपस्थित निविदाधारक यांच्या समोर उघडणे.<br>१३. उघडण्यात आलेल्या आर्थिक प्रस्तावांमध्ये काही गणिती चूक असल्यास दुरुस्त करून आर्थिक तपासणी /मूल्यमापन अहवाल संपदान समितीने तयार करून त्यावर संपादन समितीने स्वाक्षरी करणे.<br>१४. गरज असल्यास सर्वात कमी दर सादर केलेल्या निविदाधारक यांच्या समवेत त्याने सादर केलेल्या दराबाबत वाटाघाटी करणे.<br>१५. निश्चित केलेल्या निविधाराकास व अंतिम निश्चित केलेल्या दरास संचालक मंडळाची मान्यता घेऊन पुरवठा आदेश/कार्यादेश निवड केलेल्या पुरवठादारास /ठेकेदारास देणे.<br>१६. पुरवठा आदेश/कार्यादेशा देण्यात आलेल्या पुरवठादार /ठेकेदार बरोबर करार करणे.<br>१७. पुरवठा आदेशानुसार वस्तूंचा पुरवठा / बांधकाम पूर्ण झाल्यानंतर देयक अदा करणे. |
| ८ | **संपादन आराखडा तयार करणे म्हणजे काय व तो कोण तयार करेल?** |
| | उपप्रकल्पांना राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समितीकडुन मंजुरी प्राप्त झाल्या त्यातील मंजूर घटक (वस्तू,साहित्य,बांधकामे इत्यादी) यांची संपादन प्रक्रिया कधी चालू करणार ,कशी करणार ,केव्हा पूर्ण करणार याच्या थोडक्यात आराखडा संपादन समितीने अंदाजित तारखेनुसार तयार करायचा आहे. |
| ९ | **संपादन आराखडा कोणास मंजुरीसाठी सादर करावा?** |
| | संपादन समितीने तयार केलेला संपादन आराखडा संचालकाची प्रथम मंजुरी घेऊन तो जिल्हा अंमलबजावणी कक्षास मंजुरीसाठी सादर करावा. |
| १० | **दरपत्रक मसुदा / निविदा दस्तऐवज कोणी व कसा तयार करायचा आहे?** |
| | दरपत्रक मसुदा / निविदा दस्तऐवज संपादन घटकाच्या अंदाजित खर्चाच्या अनुषंगाने प्रकल्पाने निश्चित केलेल्या दरपत्रक मसुदा / निविदा दस्तऐवज मसुद्यानुसार संपादन समितीने तयार करावयाचे आहेत. |
| ११ | **मंजूर घटकांतील वस्तू/साहित्य/मशिनरी यांचे तांत्रिक तपशील / स्पेसिफिकेशन कोणी निश्चित करायचे आहेत?** |
| | समुदाय आधारित संस्था स्तरावर मंजूर घटकतील यंत्र समुग्रीचे संपादन करताना यंत्र समुग्रीचे स्पेसिफिकेशन हे समुदाय आधारित संस्थेने त्यांच्या स्तरावर यांत्रिकी अभियंता किंवा समतुल्य अभियंता यांच्या मार्फत निश्चित करावे तथापि असे करत असताना यंत्र सामुग्रीच्या कोणत्याही एका ब्रँडचे /मॉडेलचे नाव लिहू नये व तसे लिहणे गरजेचे असल्यासच त्यापुढे “किंवा समतुल्य” असा शब्द लिहावा.निविदा दस्तऐवजामध्ये शासकीय मापदंडातील नमूद केलेले सर्व घटक नमूद असणे आवश्यक आहे. |

| अ. क्र. | विचारण्यात येणारे प्रश्न व त्याबाबतची माहिती |
| --- | --- |
| १२ | **मंजूर बांधकाम घटकासाठी ठेकेदार निवडीसाठी निविदा प्रसिद्ध करताना त्यासाठी लागणारे ड्राइंग, अंदाजपत्रक कोणी तयार करायचा आहे?** |
| | समुदाय आधारित संस्थेने त्यांच्या स्तरावर निवड केलेल्या सनदी अभियंता यांच्या कडून तयार करून घ्यायचे आहेत. |
| १३ | **RCC / PEB साठी Structural design चे काम कोणी व कधी करायचे आहे?** |
| | RCC / PEB साठी Structural design हे काम बांधकामाच्या निविदा प्रक्रियेतून नियुक्त झालेल्या ठेकेदाराने त्याच्या खर्चाने तयार करून त्यानुसार बांधकाम पूर्ण करावयाचे आहे. |
| १४ | **संपादन प्रक्रियेत पूर्व मान्यता घेणे म्हणजे काय?** |
| | समुदाय आधारित संस्थेने मंजूर घटकांसाठी संपादन प्रक्रिया करीत असताना खरेदीच्या घटकाचा अंदाजित खर्च रु. १० लाखापेक्षा जास्त असल्यास संपादन प्रक्रीयेत काही त्रुटी राहू नये याकरिता खालील प्रत्येक टप्यावर जिल्हा अंमलबजावणी कक्षास दस्तऐवज तपासणी करिता सादर करायचे आहेत.<br>१) दरपत्रक विनंती पत्रक/ निविदा दस्तऐवज प्रारूप<br>२) तांत्रिक दस्तऐवज तपासणी/मूल्यमापन अहवाल |
| १५ | **संपादन पद्धती कशावर ठरवायच्या असतात?** |
| | संपादन पद्धत ही ज्या घटकाची/बाबींची संपादन करावयाची आहे त्याच्या अंदाजित खर्चे किती आहे त्यावर संपादन पद्धत ठरत असते. |
| १६ | **समुदाय आधारित संस्था स्तरावर किती प्रकारच्या संपादन पद्धती आहेत?** |
| | समुदाय आधारित संस्था स्तरावर खालील प्रमाणे एकूण ४ संपादन पद्धती आहेत त्यानुसारच संपादन प्रक्रिया करावयाची आहे.<br>१. थेट खरेदी: रु. २० हजारापर्यंत<br>२. शॉपिंग पद्धत: स्थानिक पातळीवर दरपत्रके मागवून (रु. २० हजारापुढे ते ३ लाखापर्यंत)<br>३. शॉपिंग पद्धतीने: एका जिल्हा स्तरावरील चांगला खप असलेल्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन दरपत्रके मागवून (रु.३ लाखापेक्षा जास्त ते रु. ४० लाखापर्यंत)<br>४. शॉपिंग पद्धतीने: एका विभागीय स्तरावरील चांगला खप असलेल्या वृत्तपत्रात (संबंधित विभागातील सर्व जिल्ह्यात जाहिरात प्रसिद्धी/ दिसणे आवश्यक ) जाहिरात देऊन दरपत्रके मागवून (रु.४० लाखापेक्षा जास्त ते रु. ७० लाखापर्यंत)<br>५. स्थानिक निविदा पद्धतीने एका राज्य स्तरावरील चांगला खप असलेल्या वृत्तपत्रात (महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये जाहिरात प्रसिद्धी /दिसणे आवश्यक ) निविदा प्रसिद्ध करून (रु.७० लाखापेक्षा जास्त ते रु.७ कोटी) |
| १७ | **रु. २० हजारापर्यंत संपादन प्रक्रिया कशी करायची?** |
| | जर एखादी वस्तू/साहित्य/सेवा/बांधकाम यांची खरेदीची रक्कम रु. २० हजारापर्यंत असल्यास अशा बाबींची खरेदी थेट खरेदी करता येईल त्यासाठी दरपत्रक मागविण्याची आवश्यकता नाही. परंतु अशा प्रकारे खरेदी करण्यात येणारी वस्तूची किमत एका आर्थिक वर्षात रु. २० हजारापेक्षा जास्त असता कामा नये. |
| १८ | **रु. २० हजारापुढे ते ३ लाखापर्यंतची संपादन प्रक्रिया कशी करावी?** |
| | प्रकल्पाने दि. २८ ऑगस्ट २०२२ रोजी निर्गमित केलेल्या संपादन मार्गदर्शक सुचनेतील मुद्दा क्र. ५.२ नुसार करणे बंधनकारक आहे. |
| १९ | **रु.३ लाखापेक्षा जास्त ते रु. ४० लाखापर्यंतची संपादन प्रक्रिया कशी करावी?** |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विचारण्यात येणारे प्रश्न व त्याबाबतची माहिती</th></tr>
<tr><td></td><td>प्रकल्पाने दि. २८ ऑगस्ट २०२२ रोजी निर्गमित केलेल्या संपादन मार्गदर्शक सुचनेतील मुद्दा क्र. ५.३ नुसार करणे बंधनकारक आहे.त्याकरिता निविदा सूचना एका जास्त खप असलेल्या एका जिल्हा स्तरावरील वृत्तपत्रात प्रसिद्ध करायची आहे.</td></tr>
<tr><td>२०</td><td>रु.४० लाखापेक्षा जास्त ते रु. ७० लाखापर्यंतची संपादन प्रक्रिया कशी करावी?</td></tr>
<tr><td></td><td>प्रकल्पाने दि. २८ ऑगस्ट २०२२ रोजी निर्गमित केलेल्या संपादन मार्गदर्शक सुचनेतील मुद्दा क्र. ५.३ नुसार करणे बंधनकारक आहे. त्याकरिता निविदा सूचना एका वृत्तपत्राच्या त्या विभागातील सर्व आवृत्ती मध्ये प्रसिद्ध करायची आहे.</td></tr>
<tr><td>२१</td><td>रु.७० लाखापेक्षा जास्त ते रु.७ कोटी पर्यंतची संपादन प्रक्रिया कशी करावी?</td></tr>
<tr><td></td><td>प्रकल्पाने दि. २८ ऑगस्ट २०२२ रोजी निर्गमित केलेल्या संपादन मार्गदर्शक सुचनेतील मुद्दा क्र. ५.४ नुसार करणे बंधनकारक आहे.त्याकरिता निविदा सूचना एका वृत्तपत्राच्या सर्व महाराष्ट्र आवृत्ती मध्ये प्रसिद्ध करायची आहे.</td></tr>
<tr><td>२२</td><td>एक लिफाफा पद्धत म्हणजे काय? कोणत्या संपादन पद्धतीत वापरली जाते?</td></tr>
<tr><td></td><td>एक लिफाफा म्हणजे निविदाधारकांनी त्यांचे तांत्रिक दस्तऐवज व आर्थिक प्रस्ताव एकत्रित एका लिफाफ्यात जमा /सादर करायचे असतात. सदरची पद्धत रु. ३ लाखापर्यंतच्या संपादन पद्धतीत वापरण्यात यावी.</td></tr>
<tr><td>२३</td><td>दोन लिफाफा पद्धत म्हणजे काय? दोन लिफाफे कोणत्या संपादन पद्धतीत वापरली जाते?</td></tr>
<tr><td></td><td>दोन लिफाफा म्हणजे निविदाधारकांनी त्यांचे तांत्रिक दस्तऐवज हे एका सिलबंध लिफाफ्यात व आर्थिक प्रस्ताव दुसऱ्या सिलबंध लिफाफ्यात आणि हे दोन्ही सिलबंध लिफाफे एकत्रित एका तिसऱ्या स्वतंत्र सिलबंध लिफाफ्यात जमा /सादर करायचे असतात. सदरची पद्धत रु. ३ लाखापुढील संपादन पद्धतीत वापरण्यात यावी.</td></tr>
<tr><td>२४</td><td>निविदा शुल्क निविदाधारक यांच्याकडून कशासाठी घेण्यात येते व ती निविदाधारकास परत करायची असते का?</td></tr>
<tr><td></td><td>रुपये ३ लाखावरील निविदा प्रक्रियेमध्ये फक्त इच्छुक व पात्र निविदाधारकांनी भाग घेण्यासाठी तसेच निविदा प्रक्रियेस येणारा खर्चाकरिता विना परतावा निविदाधारकाकडून निविदा शुल्क घेण्यात येते.</td></tr>
<tr><td>२५</td><td>समुदाय आधारित संस्था स्तरावर निविदा प्रक्रियेत निविदा शुल्क आकारणे बंधनकारक आहे का? असल्यास निविदा शुल्क किती आकारण्यात यावी?</td></tr>
<tr><td></td><td>निविदा प्रक्रियेत निविदा शुल्क आकारणे बंधनकारक नाही तथापि समुदाय आधारित संस्थने त्यांच्या स्तरावर निर्णय घेऊन निविदा शुल्क आकारण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. जर निविदा शुल्क आकारण्याचा निर्णय झाल्यास साधारण खालील प्रमाणे निविदा शुल्क आकारण्यात यावी.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>निविदेची अंदाजित रक्कम</th><th>निविदा शुल्क</th></tr>
<tr><td>१</td><td>रु. ३ लाख ते रु. ५० लाखापर्यंत</td><td>रु. ५०० + GST</td></tr>
<tr><td>२</td><td>रु. ५० लाखापेक्षा जास्त ते रु. २ कोटी</td><td>रु. १००० + GST</td></tr>
<tr><td>३</td><td>रु. २ कोटी पेक्षा जास्त ते रु. ५ कोटी</td><td>रु. २००० + GST</td></tr>
<tr><td>४</td><td>रु. ५ कोटी पेक्षा जास्त ते रु. १०० कोटी</td><td>रु. ३००० + GST</td></tr>
</table>
टीप: ज्या समुदाय आधारित संस्थाना GST लागू आहे अशा संस्थानीच GST ची रक्कम आकारण्यात यावी. म्हणजेच ज्या समुदाय आधारित संस्थांनी GST अंतर्गत नोंदणी करून GST नंबर मिळाला आहे त्यांनी मूळ निविदा रक्कम अधिक त्यावर १८% GST लावून एकूण निविदा शुल्क आकारण्यात यावी. ज्या समुदाय आधारित संस्थांनी GST अंतर्गत नोंदणी केली नसल्यास अशा संस्थांनी केवळ निविदाची मूळ रक्कम निविदा</td></tr>
</table>

| अ. क्र. | विचारण्यात येणारे प्रश्न व त्याबाबतची माहिती |
|---|---|
| | शुल्क आकारण्यात यावी. |
| २६ | **निविदा प्रक्रियेत EMD म्हणजे काय?** |
| | निविदा प्रक्रियेमध्ये फक्त इच्छुक व पात्र निविदाधारकांनी भाग घेण्यासाठी व त्यांनी सादर करण्यात आलेल्या निविदा ही निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत निविदा प्रक्रियेतून बाहेत पडू नये , त्याने सादर केलेल्या आर्थिक प्रस्तावामध्ये काही चूक असल्यास ती दुरुस्त करणे ,निविदा प्रक्रियेत निवड झाल्यानंतर त्याने विहित मुदतीत करार करणे व परफॉर्मन्स सिक्युरिटी जमा करणे इत्यादी करिता निविदाधारकांकडून निविदा सादर करताना EMD ही निविदा सुरक्षा ठेव म्हणून घेण्यात येते. |
| २७ | **निविदा प्रक्रियेत EMD कोणत्या स्वरुपात घेण्यात येते?** |
| | EMD ही डिमांड ड्राफ्ट ,बँक ग्यारंटी किंवा बीड सिक्युरिटी डिक्लरेशन स्वरुपात सादर करता येते. परंतु निविदाधारकांचे यामध्ये पैसे गुंतून राहत असल्याने निविदा प्रक्रियेमध्ये कमी प्रतिसाद मिळण्याची शक्यता असते त्यामुळे स्मार्ट प्रकल्पामध्ये EMD ही बीड सिक्युरिटी डिक्लरेशन (स्वयं घोषित ) स्वरुपात घेण्याबाबत समुदाय आधारित संस्थाना सुचवण्यात आले आहे. बीड सिक्युरिटी डिक्लरेशन मध्ये निविदाधाराकाचे कोणत्याही स्वरुपात पैसे गुंतून पडत नसून त्याने स्वयं घोषित घोषणापत्र देयचे असते कि निविदा दस्तऐवज मधील सर्व अटी शर्तींचे पालन करीन व तसे न झाल्यास त्यास जागतिक बँकेच्या , शासनाच्या कोणत्याही निविदा प्रक्रिये तीन वर्षासाठी भाग घेता येणार नाही. |
| २८ | **निविदा प्रक्रियेत EMD रक्कम घेणे बंधनकारक आहे का?** |
| | निविदा प्रक्रियेत जास्तीत जास्त पुरवठादार/ठेकेदार यांनी सहभागी होण्यासाठी निविदा प्रक्रियेत ई.एम.डी. रक्कम घेणे बंधनकारक करण्यात आले नाही परंतु ई.एम.डी. रकमेच्या ऐवजी बीड सिक्युरिटी डीक्लरेशन घेणे बंधनकारक आहे. |
| २९ | **रु ७० लाखापर्यंतच्या संपादन पद्धतीत निविदाधारकांना दरपत्रक/निविदा सादर करण्यास कमीत कमी किती दिवसाचा कालावधी देण्यात यावा?** |
| | रु. ७० लाखापर्यंतच्या संपादन पद्धतीत निविदाधारकांना दरपत्रक /निविदा सादर करण्यास वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून कमीत कमी १५ दिवसांचा कालावधी देण्यात यावा. |
| ३० | **रु ७० लाखापुढील खरेदीच्या संपादन पद्धतीत निविदाधारकांना निविदा सादर करण्यास कमीत कमी किती दिवसाचा कालावधी देण्यात यावा?** |
| | रु. ७० लाखापुढील खरेदीच्या संपादन पद्धतीत निविदाधारकांना निविदा सादर करण्यास निविदा सूचना प्रसिद्ध झाल्यापासून कमीत कमी ३० दिवसांचा कालावधी देण्यात यावा. |
| ३१ | **संपादन पद्धतीत तांत्रिक दस्तऐवज तपासणी करणे म्हणजे काय?** |
| | निविदा दस्तऐवजा मध्ये पुरवठादार/ ठेकेदार यांच्या किमान पात्रता अटी नमूद केलेल्या असतात. तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर प्रत्येक पुरवठादार/ ठेकेदाराने किमान पात्रता अटीनुसार दस्तऐवज सादर केले आहेत का व केले असतील तर ते त्या किमान पात्रता अटींची पूर्तता करीत आहेत का याची तपासणी केली जाते. जे पुरवठादार/ ठेकेदार सर्व किमान पात्रता अटींची पूर्तता करतात त्यांना तांत्रिकदृष्ट्या पात्र व जे कोणतीही एक किंवा अनेक अटींची पूर्तता करिता नाहीत ते तांत्रिकदृष्ट्या अपात्र असे घोषित केले जाते त्या अहवालास तांत्रिक दस्तऐवज तपासणी अहवाल असे संबोधले जाते. |
| ३२ | **संपादन पद्धतीत तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर तांत्रिक दस्तऐवज तपासणी करताना निविदा दस्तऐवज मध्ये नमूद केलेली एखादी पात्रता अट शिथिल करता येते का?** |
| | तांत्रिक दस्तऐवज उघडल्यानंतर निविदा दस्तऐवजातील कोणतीही पात्रता अट किंवा इतर बाबी शिथिल |

| अ. क्र. | विचारण्यात येणारे प्रश्न व त्याबाबतची माहिती |
|---|---|
| | करता येत नाहीत. |
| ३३ | **संपादन पद्धतीत तांत्रिक दस्तऐवज तपासणी करताना निविदाधारकाचे अपूर्ण दस्तऐवज मागविता येतील का?** |
| | निविदा प्रक्रियेत जास्तीत जास्त निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र होऊन जास्तीत जास्त स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी अपूर्ण दस्तऐवज हे समुदाय आधारित संस्थेच्या संपादन समितीच्या मान्यतेनंतर मागविता येतील. असे करीत असताना अपूर्ण असलेले दस्तऐवज हे निविदाधारकास लिखित स्वरुपात ईमेल द्वारे तसेच फोन द्वारे कळवून मागविण्यात यावेत व त्याकरिता संबंधित निविदाधारकास दस्तएवज प्रत्येक्ष किंवा ईमेल द्वारे सादर करण्यास त्यास कळविल्या नंतर कमीत कमी २ दिवसाचा कालावधी देण्यात यावा. परंतु असे मागविण्यात येणारे दस्तऐवज हे निविदा उघडण्या पूर्वीच्या तारखेला अस्तित्वात असणे आवश्यक आहे. याकरिता खाली काही उदाहरणे माहितीसाठी दिली आहेत.<br>उदा. १) निविदा दस्तऐवज मध्ये पुरवठादार/ ठेकेदाराने त्याच्या पूर्व अनुभवासाठी पुरवठा आदेश व पुरवठा पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे होते परंतु संबंधित निविदाधारकाने फक्त पुरवठा आदेश सादर केले असल्यास अशा वेळेस सदरच्या निविदाधारकांकडून पुरवठा पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र मागवून घेता येईल.<br>उदा. २) निविदा दस्तऐवज मध्ये पुरवठादार/ ठेकेदाराने GST प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे होते परंतु संबंधित निविदाधारकाने ते सादर केले नसल्यास अशा वेळेस सदरच्या निविदाधारकांकडून GST प्रमाणपत्र मागविता येईल परंतु सदरचे GST प्रमाणपत्र हे निविदा उघडण्या पूर्वीच्या तारखेस नोंदणीकृत केलेलं असणे आवश्यक आहे. |
| ३४ | **रु. ३ लाखापुढील संपादन पद्धतीत कमीत कमी किती निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र होणे आवश्यक आहेत?** |
| | रु. ३ लाखापुढील संपादन पद्धतीत कमीत कमी २ (दोन) निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र होणे आवश्यक आहेत. |
| ३५ | **निविदापूर्व बैठक कशासाठी घेण्यात येते?** |
| | निविदा दस्तऐवज प्रसिद्ध झाल्यानंतर संभाव्य पुरवठादार/ठेकेदार यांनी निविदा मधील अटी शर्ती वाचल्यानंतर त्यांना त्यातील काही मुद्दे कळाले नसतील तर त्याबाबत त्यांना माहिती देणे. तसेच निविदा दस्तऐवज मध्ये काही त्रुटी राहिल्या असतील किंवा काही चुका झाल्या असतील तर त्याबाबत संभाव्य निविदाधारकानकडून त्याबाबत माहिती मिळते व त्याची दुरुस्ती निविदा सादर करण्यापूर्वी करता येते. |
| ३६ | **निविदापूर्व बैठक कधी घेण्यात यावी? सदरच्या बैठकीस निविदाधारकानी हजर असणे बंधनकारक आहे का?** |
| | निविदापूर्व बैठक ही साधारण निविदा प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांनतर व निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी ८ दिवस घेऊन त्याचे इतिवृत्त प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. निविदा सादर करण्याचा कालावधी कमी होत असल्यास निविदा सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी. |
| ३७ | **निविदापूर्व बैठककीचे इतिवृत्त समुदाय आधारित संस्थेस प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे का?** |
| | सर्व इच्छुक निविदाधारकांना निविदा दस्तऐवज मध्ये काही बदल झाला असल्यास ते सर्वांना कळणे आवश्यक आहे त्याकरिता निविदापूर्व बैठकीचे इतिवृत्त समुदाय आधारित संस्थेस प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. |
| ३८ | **निविदा प्रक्रियेत बांधकामासाठी ठेकेदार निवडीसाठी साधारण कोणत्या किमान पात्रता अटी असाव्यात?** |
| | १) केंद्र किंवा राज्य PWD किंवा कोणत्याही सरकारी विभागाद्वारे जारी केलेल्या योग्य वर्गानुसार बांधकामे करण्यासाठी वैध परवाना असणे आवश्यक आहे. |
| | २) इमारतीच्या विद्युतीकरणाची कामे करण्यासाठी वैध विद्युत परवाना असणे आवश्यक आहे (कामे उप-कंत्राटदार असल्यास, उप-कंत्राटदाराकडे आवश्यक परवाना असणे आवश्यक आहे) |

| अ. क्र. | विचारण्यात येणारे प्रश्न व त्याबाबतची माहिती |
|---|---|
| | ३) मागील पाच आर्थिक वर्षातील किमान एका वर्षाची आर्थिक उलाढाल कामाच्या अंदाजित खर्चा एवढी असावी. |
| | ४) निविदा मागविण्यात आलेल्या महिन्याच्या अगोदरच्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी संपलेल्या मागील पाच वर्षात समान कामे यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचा खालील पैकी एक अनुभव असावा. |
| | अ) तीन समान पूर्ण झालेल्या कामांची किंमत प्रत्येकी रु [अंदाजित खर्चाच्या ४०%] पेक्षा कमी नसली पाहिजे.<br>**किवा**<br>ब) दोन समान पूर्ण झालेल्या कामांची किंमत प्रत्येकी रु [अंदाजित खर्चाच्या ५०%] पेक्षा कमी नसली पाहिजे.<br>**किंवा**<br>क) एक समान पूर्ण झालेल्या कामांची किंमत रु [अंदाजित खर्चाच्या ८०%] पेक्षा कमी नसली पाहिजे. |
| | ५) कोणत्याही सरकारी संस्था, जागतिक बँक समूह किंवा कोणत्याही बाह्य निधी एजन्सीद्वारे निविदा सादर करण्याच्या तारखेला काळ्या यादीत, प्रतिबंधित किंवा निलंबित केलेले नसावे. |
| | ६) वस्तू आणि सेवा कर अंतर्गत नोंदणीकृत असावा. |
| | ७) तरल मालमत्ता आणि/किंवा क्रेडिट सुविधांची अंदाजित निविदा रकमेच्या किमान २५% उपलब्धता असावी त्याबाबतचे कोणत्याही वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थेचे पत्र किंवा सॉल्वान्सी प्रमाणपत्र |
| ३९ | **निविदा प्रक्रियेत वस्तू/साहित्य/मशिनरी इत्यादी पुरवठा करण्यासाठी पुरवठादार निवडीसाठी साधारण कोणत्या किमान पात्रता अटी असाव्यात?** |
| | **अ) जर निविदाधारक स्वत: उत्पादक असल्यास** |
| | १) मागील तीन आर्थिक वर्षातील किमान एका वर्षाची आर्थिक उलाढाल अंदाजित खर्चाच्या साधारण दुप्पट असावी |
| | २) निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी किमान तीन वर्षे तत्सम स्वरूपाच्या वस्तूचा तयार केल्याचा अनुभव असावा |
| | ३) निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी किमान तीन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी किमान प्रस्तावित निविदेमधील वस्तूच्या संख्ये एवढे समान स्वरूपाच्या वस्तूच्या उत्पादनाची क्षमता असावी |
| | ४) कोणत्याही सरकारी संस्था, जागतिक बँक समूह किंवा कोणत्याही बाह्य निधी एजन्सीद्वारे निविदा सादर करण्याच्या तारखेला काळ्या यादीत, प्रतिबंधित किंवा निलंबित केलेले नसावे. |
| | ५) वस्तू आणि सेवा कर अंतर्गत नोंदणीकृत असावा |
| | **ब) जर निविदाधारक स्वत: वस्तूचा उत्पादक नसल्यास** |
| | १) मागील तीन आर्थिक वर्षातील किमान एका वर्षाची आर्थिक उलाढाल अंदाजित खर्चाच्या साधारण दुप्पट असावी |
| | २) निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी किमान तीन वर्षामध्ये कमीत कमी एका वर्षात अंदाजित किमतीच्या ८०% रकमेचा समान स्वरूपाच्या वस्तूची विक्री केलेली असावी.<br>**किंवा**<br>निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी मागील तीन वर्षात कोणत्याही एका वर्षात किमान प्रस्तावित निविदेमधील वस्तूच्या ८०% एवढ्या समान स्वरूपाच्या वस्तूंचा पुरवठा केलेला असावा. |
| | ३) ज्या वस्तूचा पुरवठा करणार आहे अश्या वस्तूचा तो अधिकृत डीलर किवा उत्पादक वितरक असावा |

| अ. क्र. | विचारण्यात येणारे प्रश्न व त्याबाबतची माहिती |
|---|---|
| | ४) कोणत्याही सरकारी संस्था, जागतिक बँक समूह किंवा कोणत्याही बाह्य निधी एजन्सीद्वारे निविदा सादर करण्याच्या तारखेला काळ्या यादीत, प्रतिबंधित किंवा निलंबित केलेले नसावे. |
| | ५) वस्तू आणि सेवा कर अंतर्गत नोंदणीकृत असावा. |
| ४० | **समुदाय आधारित संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या बांधकामासाठी आर्थिक प्रस्ताव कसे मागविण्यात यावे?** |
| | बांधकामासाठी निविदा मध्ये बाब निहाय(Item wise)ठेकेदाराकडून दर मागविण्यात यावे. अंदाजित रकमेच्या +/- % नुसार निविदा मागविता येणार नाही. |
| ४१ | **समुदाय आधारित संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या बांधकामासाठी निविदा दस्तऐवज मध्ये प्रत्येक बाबींचे दर नमूद करायचे असतात का?** |
| | निविदा दस्तऐवज मध्ये एकूण अंदाजित खर्च नमूद करायचा असून त्यात बाब निहाय अंदाजित खर्च नमूद करायचा नाही. निविदाधारकाने त्याच्या आर्थिक प्रस्तावात (BOQ)मधील प्रत्येक बाबींचा दर संख्येत व अक्षरी मध्ये देयचा आहे. |
| ४२ | **परफॉर्मन्स सिक्युरिटी ठेव / कामगिरी सुरक्षा ठेव म्हणजे काय?** |
| | निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवड करण्यात आलेल्या पुरवठादाराने/ठेकेदाराने पुरवठा आदेशात /letter of acceptance मध्ये नमूद केल्यानुसार निश्चित केलेल्या वेळेत निश्चित केलेल्या स्पेफीफिकेशन नुसार वस्तूचा पुरवठा/ बांधकाम पूर्ण करावे यासाठी पुरवठादार/ठेकेदार यांच्याकडून परफॉर्मन्स सिक्युरिटी ठेव / कामगिरी सुरक्षा ठेव घेण्यात येते. जर पुरवठादार/ठेकेदार हा वस्तु/बांधकाम पूर्ण करण्यास अयशस्वी झाल्यास सदरची रक्कम जप्त करण्याचा अधिकार संस्थेस आहे. |
| ४३ | **परफॉर्मन्स सिक्युरिटी ठेव / कामगिरी सुरक्षा कोणत्या स्वरुपात स्वीकारता येते?** |
| | परफॉर्मन्स सिक्युरिटी ठेव/कामगिरी सुरक्षा ही डिमांड ड्राफ्ट ,बँक ग्यारंटी स्वरुपात स्वीकारता येते. |
| ४४ | **विहित वेळेत वस्तूचा पुरवठा केला नाही तर किती दंड आकारण्यात यावा?** |
| | पुरवठा आदेशात नमूद केल्यानुसार पुरवठादारास निश्चित केलेल्या वेळेत निश्चित केलेल्या स्पेसिफिकेशन नुसार वस्तूंचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. काही कारणास्तव पुरवठादार विहित वेळेत वस्तूचा पुरवठा करू शकला नाही तर @०.५ % प्रती आठवडा या प्रमाणे दंड आकारण्यात यावा व तो बिलाच्या रकमेतून वजा करण्यात यावा. (ज्या वस्तूंचा पुरवठा विहित वेळेत केलेला नसेल तेवढ्याच वस्तूंच्या किमतीतून दंड वजा करावा) |
| ४५ | **विहित वेळेत बांधकाम पूर्ण केले नाही तर किती दंड आकारण्यात यावा?** |
| | करारात नमूद केल्यानुसार ठेकेदाराने निश्चित केलेल्या वेळेत बांधकाम पूर्ण केले नाही तर @०.०५ % प्रति दिवस या प्रमाणे दंड आकारण्यात यावा व तो बिलाच्या रकमेतून वजा करण्यात यावा. |
| ४६ | **बांधकामामध्ये रिटेन्शन मनी म्हणजे काय?** |
| | बांधकामामध्ये ठेकेदारास करारात निश्चित केलेल्या टप्प्यांवर झालेल्या बांधकामाचे बिल अदा केले जाते. अशा वेळेस प्रत्येक टप्यावर अदा करण्यात येणाऱ्या बिलाच्या साधारण ६% रक्कम सुरक्षा ठेव ठेकेदाराने कराराप्रमाणे काम वेळेवर व दोषमुक्त करण्यासाठी संस्थने स्वतःकडे राखून ठेवली असते. सर्व बांधकाम पूर्ण झाल्यानंतर राखून ठेवलेल्या रकमेपैकी अर्धी रक्कम काम पूर्ण झाल्यावर परत केली जाते आणि उर्वरित अर्धी रक्कम दोष दायित्व कालावधी संपल्यावर अभियंते या कालावधीच्या समाप्तीपूर्वी कंत्राटदाराला सूचित केलेले सर्व दोष दुरुस्त केले गेले आहेत असे प्रमाणपत्र दिल्यानंतर परत केली जाते. |
| ४७ | **यंत्रसामुग्री संपादन प्रक्रियेत निवड झालेल्या पुरवठादारास अग्रिम देता येते का?** |
| | निविदा दस्तऐवज मध्ये निवड झालेल्या पुरवठादारास अग्रिम देण्याबाबत तरतूद असल्यास सदर तरतुदीनुसार |

| अ. क्र. | विचारण्यात येणारे प्रश्न व त्याबाबतची माहिती |
|---|---|
| | बँक ग्यारंटी सादर केल्या नंतर अग्रिम देता येईल. |
| ४८ | **बांधकाम पूर्ण करण्यासाठी ठेकेदारास किती दिवसाचा कालावधी द्यायला पाहिजे?** |
| | बांधकाम पूर्ण करण्यासाठी ठेकेदारास साधारण खालील प्रमाणे कालावधी देण्यात यावा. सदरच्या विहित कालावधीमध्ये पावसाळी दिवस व सार्वजनिक सुट्टी यांचा समावेश आहे.<br>रु. ५ ते १५ लाखापर्यंत : १०० दिवस<br>रु. १५ ते रु. ५० लाखा पर्यंत : १८० दिवस<br>रु. ५० लाख पुढील : ३०० दिवस<br>गरजेनुसार सी.बी.ओ.ने संबंधित विभागीय अभियंता यांच्या सल्याने त्यामध्ये बदल करू शकतात. तथापि निश्चित केलेला बांधकाम पूर्ण करण्याचा कालावधी हा निविदा प्रसिद्ध करताना निविदा सूचना तसेच निविदा दस्तऐवज मध्ये नमूद करणे आवश्यक आहे. |

स्मार्ट प्रकल्प